Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2407II03V12P0029

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On
CPDE July'2024
Issue–II(III), Volume–XII

# गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांना संगणक हाताळण्यात येणाऱ्या समस्या व उपाययोजना

**संशोधक**
**श्री. जनार्दन कारभारी राऊत**
एम.ए.,एम.एड. सेट(शिक्षणशास्त्र)

**१.१ प्रस्तावना:-**

जागतिक पातळीवर सातत्याने तंत्रज्ञानाच्या बाबतीत अतिशय झपाटयाने बदल होत आहे. संपूर्ण विश्व हे एक खेडे बनले आहे. तंत्रज्ञानामध्ये प्रगती करणे व आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. निसर्गातील जो सजीव काळानुसार स्वत:मध्ये बदल घडवून आणू शकत नाही, तो सजीव स्वत:चे अस्तित्त्व टिकवू शकत नाही.

जागतिक पातळीवर संगणकीय क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात प्रगती घडून आलेली आहे. भारत हा एक विकसनशील देश असून इतर प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत भारतीय संगणकीय क्षेत्रामध्ये लक्षणीय प्रगती आढळून येत नाही. याचे कारण भारतीय व्यक्तिंमध्येसंगणकीय ज्ञानाचा मोठया प्रमाणात अभाव दिसून येतो, म्हणून शासनाने शालेय अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना संगणकीय दृष्टया सक्षम बनविण्याच्या दृष्टिने विविध योजनांचा समावेश शैक्षणिक धोरणांमध्ये केला आहे.

तंत्रज्ञानाच्या प्रभावापासून शिक्षण प्रणाली विभक्त करु शकत नाही. शिक्षण क्षेत्रात तंत्र -ज्ञानाच्या उपयोगामुळे, तांत्रिक साधनांच्या वापरामुळे क्रांती घडून येत आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासातून सपसंगणकाची निर्मिती झालेली आहे. कमीतकमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत जास्तीत जास्त प्रभावीपणे ज्ञान पोहचविण्याचे कामसंगणक करत आहे. संगणकाचा वापर प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रभावीपणे होत आहे. शैक्षणिकतसेच सर्वच क्षेत्रामध्येसंगणकाचा वापर होतोयतरी देखील जिल्हा परिषदेच्या बहुतांश प्रशालेतील शिक्षकसंगणकाचा वापर कमी प्रमाणात करतांना आढळून येतात.

एखादया निरक्षर व्यक्तिला आपण ज्यावेळी एखादी भाषा शिकवू लागतो, त्यावेळी त्या भाषेच्या लिपितील अक्षर ओळख, शब्द रचना, वाक्य रचना इ. ची ओळख करुन देतो. एवढी ओळख झाली म्हणजे त्या भाषेचे ज्ञान झाले असे नाही. परंतु त्या भाषेत लिहिलेला साधा सोपा मजकूर समजण्यास अडचण पडत नाही. किंबहुना एवढे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक असते. तसेच कोणताही नविन विषय शिकायला असेलतर त्या विषयाची जी एक विशिष्ट भाषा असते, ती माहित करुन घेतल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. त्याचप्रमाणेसंगणकाच्या बाबतीत देखीलत्याची विशिष्ट भाषेची किमान ओळख करुन घेणे आवश्यक असते. उदा. माहिती साठविणे, मिळविलेल्या माहितीवर प्रक्रिया करणे, व माहितीची देवाण घेवाण करणेतसेचसंगणकस्मृती, प्रोग्रॅमिंग, इनपुटसाधने, आऊट पुटसाधने, सेंट्रल प्रोसेसिंग युनिट (मध्यवर्ती प्रक्रिया), इत्यादीसंगणकाची ज्ञान साक्षरता असे म्हणता येईल. संगणकाचा शैक्षणिक क्षेत्रामध्ये अध्ययन अध्यापन प्रक्रियेततसेच विविध कामांसाठी उपयोगहोत आहे. त्यासाठी शिक्षकांनी अध्यापन प्रभावी होण्यासाठीसंगणकसाक्षर असायलाच हवे. शिक्षणामधीलहोणाऱ्या विविध संशोधनाची माहिती मिळविण्यासाठी

त्याचप्रमाणे शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया, परीक्षा प्रक्रिया इतर सर्व अभिलेखे अद्ययावत ठेवण्यासाठी संगणकाचा उपयोगहोऊ लागला आहे. त्यामुळे शिक्षकांना संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक झाले आहे.

**१.२ शोध निबंधाची गरज :-**

नवनवीन माहिती मिळविण्यासाठीसंगणकाचा उपयोगहोतो. त्याचप्रमाणे आवश्यक असणारी माहितीसंगणकाच्या सहाय्याने उपलब्ध करुन घेता येते. वर्गामध्ये पारंपारिक पध्दतीने अध्यापन करत असतांना शिक्षकाला विविध प्रकारचे संदर्भ हवे असतात. असे संदर्भग्रंथ पाहण्यासाठी शिक्षकांना ग्रंथालयात जाऊनतो ग्रंथ पाहावा लागेल यासाठी शिक्षकांचा बराच वेळ वाया जाऊ शकतो. त्याऐवजी संगणकावर साठविलेली माहिती आवश्यक तेव्हा मिळविणे सोयीचेहोते. एकूणचसंगणकाचा वापर हा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थी संख्या, प्रवेश संख्या, परीक्षा पध्दती, निकालतयार करणे, सर्व शालेय अभिलेखे तयार करणे, जुने रेकॉर्ड अद्यावत करण्यासाठी प्रभावीपणे करता येऊ शकतो. त्याचप्रमाणे एकूण उपलब्ध शैक्षणिक साधन सामुग्री, विषयवार शिक्षकांची संख्या, विविध अभ्यासपुरक कार्यक्रमांचे नियोजन, वेळापत्रकांचे नियोजन करण्यात संगणक

विद्यार्थ्यांना विविध अध्ययन अनुभूती देणे गरजेचे असतेत्यातून विद्यार्थ्यांना विषय आकलनहोण्यास मदतहोईल. अशावेळी संगणकाच्या सहाय्याने शिकवणे आवश्यक आहे. शासकीय योजनांची माहिती शिक्षकांना मिळविण्यासाठी संगणकाची गरज पडते, आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी संगणकाचा वापर प्रभावीपणे करावा म्हणूनसदरील विषयावर संशोधन करणे गरजेचे वाटते.

**१.३ शोध निबंधाचे महत्त्व :-**

१) प्रस्तुत शोध निबंध अध्ययन-अध्यापन प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी उपयोगी पडेल.
२) प्रस्तुत शोध निबंध संगणक कमीत कमी वेळेमध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यंत माहिती पोहचविण्यासाठी उपयुक्तठरेल.
३) संगणकाच्या सहाय्याने एखादी क्रिया किंवा वस्तूचा अभ्यास संगणकावर अपेक्षित असलेली माहिती गोळा करता येईल. व माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण करता येईल.
४) प्रस्तुत शोध निबंध संगणकात इंटरनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या विविध योजना, शासकीय कागदपत्रे इत्यादी विषयी लागणारी माहिती, शिक्षक संगणकावर उपलब्ध करुन घेऊ शकतील.
५) संगणकीय ज्ञानात अधिक भर पडण्यासाठी विविध संगणक माध्यम शिक्षकांना मदत करते, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन- शिक्षकांना इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध होते.
६) प्रस्तुत शोध निबंधातून अध्यापनाशी संबंधित देश विदेशातील शिक्षक तज्ज्ञांशी संवाद साधला जाऊ शकतो तसेच विद्यार्थ्यांना अधिकाधिक मनोरंजनात्मक कल्पकतेने शिकविण्यासाठीसंगणकाचा उपयोगहोतो.

**१.४ समस्या विधान :-**

"गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांना संगणक हाताळण्यात येणाऱ्या समस्या व उपाय योजना"

**१.५ समस्या विधानातील शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या :-**

**१.५.१ गंगापूर तालुका :**

मराठवाडयाचे प्रवेशद्वार असलेला छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रगतीशील असलेला तालुका.

**१.५.२ जिल्हा परिषद :**

स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत जिल्हास्तरावर काम करणारी एक संस्था.

**१.५.३ प्रशाला :**

प्राथमिकस्तर व उच्च माध्यमिकस्तर या दोघांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शाळा किंवा प्रशाला होय.

**१.५.४ शिक्षक :**

प्रशालेत ज्ञानदान करणारे, मार्गदर्शन करणारे, अध्यापन करणारे म्हणजेच शिक्षक होय.

**१.६ गृहितके :-**

१) शिक्षकांनी अध्यापनापुर्वी संगणक विषय अभ्यासलेला नसतो.
२) सर्वच जिल्हा परिषद प्रशालेत संगणक प्रयोगशाळा अद्ययावत नसते.
३) संगणक शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध नसतो.
४) शिक्षकांना वैयक्तिकरित्या संगणक पुरविले जात नाही.

**१.७ उद्दिष्टये :-**

१) गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेतीलसंगणक न हाताळता येणाऱ्या शिक्षकांचा शोध घेणे.
२) गंगापूरतालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांनासंगणकहाताळण्यात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
३) गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांना संगणक हाताळण्यात येणाऱ्या अडचणींच्या कारणांचा शोध घेणे.
४) गंगापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांना संगणक हातळण्यात येणाऱ्या समस्यांवर उपाय सूचविणे

**१.८ परिकल्पना :-**

१. जिल्हा परिषद प्रशालांमध्ये संगणक संख्या अत्यल्प असल्याने सर्वच शिक्षकांना संगणकाची उपलब्धता होत नसावी.
२. जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांनासंगणकाच्या वापराचा सराव नसल्या कारणानेसंगणकहाताळण्यात अडचणी येत असाव्यात.
३. जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांना संगणकाचे सखोल ज्ञान नसावे.
४. जिल्हा परिषद प्रशालेत संगणकाशी निगडीत भौतिक सुविधांचा अभाव असावा.
५. जिल्हा परिषद प्रशालेतील सर्वच शिक्षकांना अध्यापनाविषयीचे संगणक प्रशिक्षण मिळत नसावे.

**१.९ मर्यादा :-**

**१.९.१ क्षेत्र मर्यादा :-** प्रस्तुत शोध निबंध हे गंगापूर तालुक्या पुरतेच मर्यादित आहे.

**१.९.२ आशय मर्यादा :-** प्रस्तुत शोध निबंध हे गंगापूरतालुक्यातील जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

**१.९.३ घटक मर्यादा :-** प्रस्तुत शोध निबंध हे जिल्हा परिषद प्रशालेतील शिक्षकांपुरते मर्यादीत आहे.

**१.९.४ काल मर्यादा :-** प्रस्तुत शोध निबंध हे सन २०२३-२०२४ या कालावधी पुरतेच मर्यादित आहे.

**१.१० निष्कर्ष :-**

१. शिक्षकांना संगणकाचे सखोल ज्ञान नाही.

२. शिक्षकांना संगणकाच्या वापराचा सराव नसल्याकारणाने संगणक हाताळण्यात अडचणी येतात.

३. शिक्षकांना अध्यापनाविषयीचे संगणक प्रशिक्षण मिळत नाही.

४. संगणक संख्या अत्यल्प असल्याने सर्वच शिक्षकांनासंगणकाची उपलब्धता होत नाही.

**१.११ शिफारशी :-**

१. शिक्षकांना संगणकाचे सखोल ज्ञान पाप्त होण्यासाठी विविध पशिक्षण कार्यकम हाती घेण्यात यावे.

२. शिक्षकांना संगणकाच्या वापराचा सराव देण्यात यावा.

३. संगणक संख्या सर्वच शिक्षकांना उपलब्ध करून द्यावी.

**१.१२ समारोप :-**

समस्येशी संबंधित पूर्ण माहिती थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधनसमस्येचे प्रास्ताविक, गरज, महत्त्व मांडले आहेतसेच समस्या, त्यातील शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या, उद्दिष्टये, गृहितके, परिकल्पना, निष्कर्ष व शिफ ारशी मांडल्या आहेत.

**१.१३ संदर्भ ग्रंथ :-**

१. मुळे रा श. आणि उमाठे, वि. तू. (१९९८) शैक्षणिकसंशोधनाची मुलतत्वे (तृतीय आवृत्ती) विद्या प्रकाशन नागपूर.

२. भिंताडे वि. रा. (२००७) शैक्षणिकसंशोधन पद्धती (प्रथम आवृत्ती) पूणे नित्यनुतन प्रकाशन.